वाचा - अ) **महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवा प्रवेश)नियम १९६७.**

ब) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय मुंबई-३२ कडील

१) शासन निर्णय क्र. अकंपा/१०९३/२३३५/प्रक्र/९०/९३/आठ दि.२६/१०/९४

२) शासन निर्णय क्रं. अकंपा/१०९५/प्रक्र/३४/अ/आठ दि.२३/८/९६

३ ) शासन निर्णय क्रं. अकंपा/१०९५/प्रक्र/३४/अ/आठ दि.११/९/९६

४ ) शासन निर्णय क्रं. अकंपा/१०९७/प्रक्र/३२/आठ दि.८/९/९७

५) शासन निर्णय क्रं. अकंपा/१०९८/प्रक्र/०५-९८/आठ दि.१०/३/९८

६) शासन निर्णय क्र. अकपा-१०००/प्र.क्र.२०/२०००/ आठ, दि.२८ मार्च २००१.

७) शासन निर्णय क्र. अकपा-१०००/प्र.क्र.५९/ २०००, दि.२४/९/२००१

८) शासन निर्णय क्र. अकपा-१०००/प्र.क्र.५९/२०००, दि.२१/११/२००२

९) शासन निर्णय क्र.अकंपा-१००४/प्र.क्र.५१/२००४/आठ दि.२२ ऑगस्ट २००५

१०) शासन निर्णय क्र.अकंपा-१००७/प्र.क्र.१८१/०७/आठ दि. १ जाने २००८

११) शासन निर्णय क्र.अकंपा-१०१०/प्र.क्र.३०८/१०/आठ दि.६/१२/२०१०

१२) शासन निर्णय क्र.बीसीसी २०११/प्रक्र.१०६४/२०११/१६-ब दि.१२/१२/२०११

१३) शासन निर्णय क्र.अकंपा/१०१३/प्र.क्र.८/आठ दि.२६/०२/२०१३.

१४) शासन निर्णय क्र.अकंपा-१०१४//प्र.क्र.१६४/आठ दि.२०/०५/२०१४

१५) शासन निर्णय क्रं अकंपा-२०१४/प्र क्रं १५५/आठ दि १७/११/२०१६

१६) शासन निर्णय क्रं अकंपा-१२१७/प्र क्रं १०२/आठ दि २१ सप्टेंबर २०१७

१७) शासन निर्णय क्रं अकंपा-१२१८/प्र क्रं ०१/आठ दि १५ फेबुवारी २०१८

१८ ) शासन निर्णय क्र संकिर्ण/१११८/प्र क्रं ३९/१६ अ दि १९ डिसेंबर २०१८

१९ ) शासन निर्णय क्रं बीसीसी २०१८/प्र क्र ५८१ए/२०१८ /१६ब दि १९ डिसेंबर २०१८

२०) शासन निर्णय क्रं अकंपा-१२१९/प्र क्रं ५६/आठ दि १० जुन २०१९

२१) शासन निर्णय क्रं अकंपा-१२१९/प्र क्रं ५६/आठ दि ११ सप्टे-२०१९

२२) शासन निर्णय क्रं अकंपा-१२२१/प्र क्रं १८६/आठ दि २६ ऑगस्ट-२०२१

क) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय मुंबई-३२ कडील

१) शासन निर्णय क्र. अकपा-१०००/प्र.क्र.२८२०/१५, दि.२१ जुलै २०००.

२) शासन निर्णय क्र. अकपा-१०००/प्र.क्र.३०३७/१५, दि. ५/०१/२००१

३) शासन निर्णय क्र. अकंपा २०१०/प्रक्र.४१०/आस्था-९ दि.२८/१२/२०१०

४) शासन परिपत्रक क्र.संकिर्ण-२०१८/प्र.क्र.१७३/आस्थापना-८, दि.२८ सप्टेंबर २०१८

५) शासन परीपत्रक क्रं संकिर्ण-२०१८/प्र क्रं १७३/ आस्था-८ दि ४ जाने २०२०

६) शासन परीपत्रक कं संकिर्ण-२०१८/प्र क्रं १७३/आस्था-८ दि ५ फेबवारी २०२०

ड) वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र.पदनि-२०१२/प्रक्र.१५/१२/वित्तीय सुधारणा-१ दि.२२/०३/२०१२

इ) वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रं.अर्थसं२०२०/प्र क्रं.६५/अर्थ-३ दि ४ मे २०२०

ई) वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रं.अर्थसं२०२०/प्र क्रं.६५/अर्थ-३ दि ३० जुलै २०२०

फ) अनुकंपा प्रतिक्षा सुची प्रसिध्द डिसेंबर २०२० व जुन २०२१ नुसार

जी ) म.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.जळगांव यांची मान्य टिपणी दि. १४/१२/२०२१

---

**आदेश**

जा.क्र.साप्रवि/आस्था-११/आरआर/५३३//२०२१
सामान्य प्रशासन विभाग जि,प,जळगाव
दिनांक - १४/१२ /२०२१

महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ व उक्त शासन निर्णयामधील तरतुदीनुसार मला असलेल्या अधिकाराचा वापर करून मी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, जळगांव खालील नमुद केलेल्या उमेदवारांना अनुकंपा तत्वावर जिल्हा सेवा (वर्ग-३) श्रेणीमधील **कनिष्ठ सहाय्यक (लेखा)** या पदावर **समयवेतनस्तर एस-६ रू.१९९००-६३२००** या वेतनश्रेणीत खालील नमूद केलेल्या अटी व शर्तीवर तात्पुरती नेमणुक करीत असून त्यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कार्यालयात रिक्त पदी पदस्थापना करीत आहे. सदर नेमणुक ही पूर्णतः तात्पुरती व अस्थायी स्वरूपाची आहे.

| अ.नं | उमेदवारांचे नांव व पत्ता | जातीचा प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग | पदस्थापीत केलेले कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | श्री आनंद पुरूषोत्तम सुरवाडे, मु.पो. प्लॉट नं ९ गट नं ४१ राम मंदिरासमोर आयोध्यानगर जळगांव ता जि जळगांव | अनु.जाती | अनु.जाती | अर्थ विभाग जिल्हा परिषद जळगांव |
| २ | श्री सादिक राजु तडवी, रा.वर्डी, ता.यावल, जि.जळगांव | अनु.जमाती | अनु.जमाती | अर्थ विभाग जिल्हा परिषद जळगांव |
| ३ | श्री अजय सुभाष सोनवणे, रा.मु.पो.नशिराबाद, ता.जि.जळगांव | अनु.जाती | अनु.जाती | अर्थ विभाग जिल्हा परिषद जळगांव |
| ४ | श्री पियुष सुरेश चव्हाण, श्री घनशाम पवार अमळनेर देशमुख नगर पिंपळेगेट प्लॉट नं २१ अ पारस ता अमळनेर जि.जळगांव | खुला | खुला | अर्थ विभाग जिल्हा परिषद जळगांव |
| ५ | श्री.नारायण साहेबराव पाटील लक्ष्मीनगर, पोलीस स्टेशनच्या मागे विद्यानगर जवळ प्लॉट नं.२ रावेर ता रावेर जि.जळगाव | इमाव | इमाव | अर्थ विभाग जिल्हा परिषद जळगांव |

सदर नेमणुक ही खालील अटीवर व शर्तीवर करण्यात येत आहे.

१) सदर नेमणुक ही पुर्णतः तात्पुरती व अस्थायी स्वरूपाची असून सदर उमेदवारास नोटीसीशिवाय केव्हाही कारण न दाखविता कमी करण्यात येईल अशी आहे.

२) सदर पदासाठी वेतनासाठी होणारा खर्च हा शासकीय मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. नेमणुकीच्या ठिकाणी हजर होण्याकरीता कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता दिला जाणार नाही.

३) **सदर उमेदवारांना अनुकंपा तत्वावर देण्यात आलेली नेमणुक नाकारता येणार नाही. सदरची नेमणुक नाकारल्यास अनुकंपा तत्वावरील नेमणुक रद्द करण्यात येईल, त्यानंतर अनुकंपा तत्वावर नेमणुक देण्यात येणार नाही. सदर उमेदवारांनी सदर आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत नियुक्तीचे कार्यालयात हजर होणे आवश्यक आहे. जर ते सदर मुदतीत हजर झाले नाहीत तर त्यांची नेमणुक रद्द म्हणून समजण्यात येईल.**

४) सदर उमेदवारास सदर पदाचा राजीनामा द्यावयाचा असेल तर त्यांनी नियुक्ती प्राधिकरणाकडेस एक महिन्याची आगावू नोटीस द्यावी अथवा एक महिन्याचा पगार नोटीसी ऐवजी जिल्हा परिषद, जळगांव चे जिल्हा निधीत त्यांना जमा करावी लागेल.

५) **सदर उमेदवारांची नेमणुक पूर्व चारित्र्य व वर्तणुक बाबत सक्षम प्राधिका-याकडील पडताळणीच्या अधिन राहून नियुक्ती करण्यात येत आहे. अशा पडताळणी / चौकशी अंती काही आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास सदर उमेदवारास शासन तरतुदीनुसार जिल्हा परिषदेतील सेवा रध्द करण्यात येईल. सदर पडताळणीसाठी आवश्यक असलेले विहीत नमुन्यातील सांक्षांकन नमुना संबंधीत कार्यालयाने उमेदवारांकडून प्राप्त करून घेवून सदर आदेशाचे दिनांकापासून दहा दिवसाचे आंत या कार्यालयाकडेस तीन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे.**

६) **सदर उमेदवारांनी नियुक्तीचे कार्यालयास हजर होण्यापूर्वी म. जिल्हा शल्य चिकित्सक जळगांव यांचेकडून वैद्यकीय तपासणी करून घेवून या जिल्हा परिषदेमध्ये सदर पदावर सेवेसाठी शारिरिक दृष्ट्या पात्र असले बाबतचा वैद्यकीय दाखला सादर करणे आवश्यक आहे. सदर उमेदवाराने या बाबत म. जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडेस सादर करावयाचे पत्र त्याचे सदरचे नियुक्तीचे कार्यालय प्रमुखाकडून प्राप्त करावयाचे आहे.**

७) **शासन निर्णय दि.१२/१२/२०११ नुसार मागासवर्गीय उमेदवाराच्या बाबतीत, उमेदवाराने नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर सहा महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून प्राप्त करून घेणे आवश्यक राहील. उमेदवाराने नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव कार्यालय प्रमुख/विभागप्रमुखामार्फत संबंधित जात पडताळणी समितीकडे सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोचपावतीची साक्षांकित प्रत नियुक्ती प्राधिकाऱ्यास सादर करावी. मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार संबंधित जात पडताळणी समितीने उमेदवारांचे जात पडताळणीचे प्रस्ताव सहा महिन्याच्या आत निकाली काढावेत. जात पडताळणी समितीने त्याचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर दिलेले नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करून अनुसुचित जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० मधील तरतुदीनुसार त्वरीत कारवाई करण्यात येईल.**

या प्रमाणे मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास सदर उमेदवाराची नेमणूक रद्द होवून त्यांच्या सेवा संपुष्टात आणल्या जावू शकतील. या बाबतचे हमीपत्र रू.१००/- चे प्रतिज्ञापत्रावर हजर होतेवेळी संबंधित उमेदवाराने कार्यालयास भरून दयावयाचे आहे.

८) सदर नियुक्तीचे कार्यालयात हजर होण्यापूर्वी सदर उमेदवारांनी यापूर्वी नोकरी (खाजगी संस्थेमध्ये किंवा खाजगी ठिकाणी)करीत असलेल्या सर्व पदांचा राजीनामा देणे आवश्यक आहे.

९) सदर उमेदवारांनी हजर झालेनंतर तीन महिन्याचे महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील नियम १७ चे तरतुदीनुसार विहीत नमुन्यातील आवश्यक ते विवरणपत्र संबंधित कार्यालय प्रमुखांचे समक्ष भरून देणे आवश्यक आहे. सदर विवरणपत्र संबंधिताचे मुळ सेवा पुस्तकात चिकटविण्यात यावे.

१०) **संबंधित कार्यालय प्रमुखांनी या आदेशातील उमेदवारांना हजर करून घेतांना त्यांचेकडून त्यांची जन्मतारीख, जातीचे प्रमाणपत्र, शैक्षणिक अर्हता, नियुक्तीचा प्रवर्ग इ. माहिती दर्शविणारी सर्व मुळ प्रमाणपत्रके तपासणी करून घेतल्या शिवाय त्यांना हजर करून घेण्यात येवू नये.**

११) सदर उमेदवारांनी संदर्भ दि.२४/९/२००१ व दि.२१/११/२००२ मधील शासन निर्णयानुसार विहीत केलेली संगणक विषयाची परिक्षा नियुक्ती दिल्यापासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. या दोन वर्षाच्या कालावधीत संबंधितांनी विहीत **संगणक अर्हता** प्राप्त केल्याचे प्रमाणपत्र नियुती अधिकाऱ्यांना सादर करावे.अन्यथा हा कालावधी संपताच उमेदवारांची अनुकंपा तत्वावरील नियुक्ती आपोआपच संपुष्टात येईल.

१२) महा.जिल्हा परिषद,जिल्हा सेवा प्रवेशोत्तर परीक्षा नियम १९८५ मधील नियम ४ मधील तरतूदीनुसार विहीत मुदतीत **सेवा प्रवेशोत्तर परिक्षा उत्तीर्ण** होणे बंधनकारक राहील.जर मुदतीत उत्तीर्ण न झाल्यास नियम ५ मधील तरतुदीनुसार त्यांच्या सेवा समाप्त करण्यात येतील.

१३) शासन निर्णय दि.२०/०५/२०१५ मधील तरतुदीनुसार सदर उमेदवारांनी यापदासाठी आवश्यक असलेलीशासकीय **मराठी व इंग्रजी टंकलेखन** विहित वेगमर्यादेची अर्हता नेमणूकीपासून ०२ वर्षाचे कालावधी पावेतो उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील.

१४) संबंधित उमेदवारांनी हजर होतांना खालील नमुन्यात कार्यालय प्रमुखाकडे '' हमीपत्र '' करून देणे आवश्यक आहे. कार्यालय प्रमुखांनी देखील असे '' हमीपत्र '' उमेदवाराने करून दिल्याशिवाय हजर करून घेवू नये. सदरचे '' हमीपत्र '' संबंधिताचे मुळ सेवा पुस्तकात चिकटविण्यात यावे.